# Regional Marathi Text Bulletin, Aurangabad
# Date – 09 October 2023
# Time 7.10 AM to 7.20 AM
# Language Marathi
# आकाशवाणी औरंगाबाद
# प्रादेशिक बातम्या
# दिनांक ०९ ऑक्टोबर २०२३ सकाळी ७.१० मि.

****

- सर्वसामान्यांसाठी परवडणाऱ्या गृहप्रकल्पांना सर्वतोपरी मदत करण्यास शासन तत्पर–महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची ग्वाही
- राज्याच्या आरोग्य व्यवस्थेबाबत सरकारनं श्वेतपत्रिका काढावी–काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात यांची मागणी
- टोलवाढीच्या विरोधात मनसे स्टाईल आंदोलनाचा राज ठाकरे यांचा इशारा
- राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत ज्वारी बियाणे वाटपाला कृषीमंत्री धनंजय मुंडे यांच्याहस्ते प्रारंभ

आणि

- एकदिवसीय क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत ऑस्ट्रेलियाला पराभूत करत भारताची विजयी सलामी

****

'परवडणारी घरे' यासारखे प्रकल्प प्राधान्याने राबवणं आवश्यक असून त्यासाठी प्राधान्य, सवलत तसंच सर्वतोपरी मदत करण्यास शासन तत्पर असल्याची ग्वाही राज्याचे महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली आहे. ते काल नागपूर इथं नॅशनल रियल इस्टेट डेव्हलपमेंट कौन्सिल – राष्ट्रीय स्थावर मालमत्ता विकास परिषदेच्या होमेथॉन या प्रदर्शनाच्या समारोप सत्रात बोलत होते. सर्वांसाठी घरे या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतील योजनेचे अपेक्षित उद्दिष्ट साध्य करण्यासाठी शहरी तसंच ग्रामीण भागातील सामान्य नागरिक, नोकरदार, लहान व्यावसायिक आणि कामगार वर्गाचा विचार करून 'परवडणारी घरे' बांधण्याकरिता

या परिषदेने पुढाकार घ्यावा, तसंच प्रत्येक शहराच्या विकासासाठी पुढाकार घेऊन विकास आराखडे तयार करण्याचं आवाहन विखे पाटील यांनी केलं.

****

राज्याच्या आरोग्य व्यवस्थेचा पुरता बोजवारा उडाल्याचा आरोप करत, त्याबाबतची सत्य परिस्थिती जनतेसमोर यावी, यासाठी सरकारनं श्वेतपत्रिका काढावी, अशी मागणी, काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात यांनी केली आहे. त्यांनी यासंदर्भात मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिलं आहे. गेल्या काही दिवसांत शासकीय रुग्णालयात झालेल्या मृत्यू प्रकरणाची जबाबदारी स्वीकारून, संपूर्ण मंत्रिमंडळानं राजीनामा द्यायला हवा, असंही त्यांनी म्हटलं आहे. वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संस्थेवर कायमस्वरूपी संचालक नाही, याबद्दलही थोरात यांनी टीका केली.

****

शिवसेना भाजपने त्यांच्या जाहीरनाम्यात टोलमुक्तीचं आश्वासन दिलं होतं, त्याचं काय झालं, असा प्रश्न, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी विचारला आहे. ते काल ठाणे इथं वार्ताहरांशी बोलत होते. टोल दरवाढी विरोधात मनसेचे ठाणे आणि पालघर जिल्हाध्यक्ष अविनाश जाधव हे गेल्या चार दिवसांपासून ठाण्याच्या वेशीवरील मुलुंड इथल्या पथकर नाक्यावर उपोषणाला बसले आहेत. राज ठाकरे यांनी काल आंदोलनस्थळी जाऊन त्यांची भेट घेतली. टोलवाढीसंदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेणार असून, त्यानंतरही सकारात्मक निर्णय झाला नाही, तर गांधीवादी मार्गाने नव्हे तर मनसे स्टाईलने आंदोलन केलं जाईल. त्याबाबतची भूमिका लवकरच जाहीर करणार आल्याचं राज ठाकरे यांनी स्पष्ट केलं.

****

उपमुख्यमंत्री अजित पवार अथवा प्रफुल्ल पटेल यापैकी कोणत्याही नेत्याच्या संपर्कात नसल्याचं, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या नेत्या खासदार सुप्रिया सुळे यांनी स्पष्ट केलं आहे. त्या काल सोलापूर इथं बोलत होत्या. मधल्या काळात दोन्ही गटात सुवर्ण मध्य काढण्यासाठी जुनी नाती जपण्याचा प्रयत्न केला, मात्र त्या सगळ्यांनी अगदीच खालच्या पातळीवर जाऊन राजकारण केल्यानंतर कुठलाच संपर्क राहिला नसल्याचं सुळे यांनी स्पष्ट केलं आहे.

****

इंडिया मेला च्या निमित्ताने भारत आणि जपान या दोन्ही देशांमधील मैत्रीभाव दृढ होऊन दोन्ही देश एकत्रीतपणे प्रगतीची नवी शिखरे सर करतील, असा विश्वास, राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला आहे. जपान मधल्या कोबे शहरात, भारत–जपान यांच्यात कला आणि खाद्य संस्कृतीला चालना देण्यासाठी आयोजित ‘इंडिया मेला’ या कार्यक्रमाच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक कार्यक्रमांचं जपानमध्ये सादरीकरण झाल्याचा सांस्कृतिक मंत्री म्हणून मनापासून आनंद असल्याचं मुनगंटीवार यांनी सांगितलं.

****

कोल्हापूरचा शाही दसरा उत्सव राज्य शासनानं ‘राज्य महोत्सव’ म्हणून घोषित केला आहे. १५ ते २४ ऑक्टोबर दरम्यान असलेल्या या महोत्सवात विविध सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत.

****

राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत बीड इथं कृषीमंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते काल रब्बी ज्वारी बियाणे वाटपाला सुरुवात झाली. राहुल नागरगोजे आणि अप्पासाहेब वायभट यांना प्रातिनिधिक स्वरुपात बियाणांचं वितरण करण्यात आलं. जिल्ह्यातल्या जवळपास सव्वा लाख शेतकऱ्यांसाठी रब्बी ज्वारीचे बियाणे उपलब्ध करण्यात आले आहे.

****

आशियाई क्रीडा स्पर्धेचा काल समारोप झाला. चीनमध्ये हाँगचाओ इथं झालेल्या या समारोप सोहळ्यात हॉकी संघाचे गोलकीपर पी आर श्रीजेश यांनी भारतीय पथकाचे ध्वजवाहक म्हणून पथकाचं नेतृत्व केलं. यापुढची आशियाई स्पर्धा जपानमध्ये होणार असून, या सोहळ्यात पहिल्या आशियाई क्रीडा स्पर्धेची ज्योत, आणि आशियाई ऑलिम्पिक परिषदेचा ध्वज, जपानला हस्तांतरीत करण्यात आला. या स्पर्धेत चीननं २०१ सुवर्ण, १११ रौप्य आणि ७१ कांस्य पदकांसह ३८३ पदकांची कमाई करत पदकतालिकेत पहिलं स्थान पटकावलं, तर जपाननं ५२ सुवर्णपदकांसह दुसरं तर कोरिया प्रजासत्ताकनं ४२ सुवर्णपदकांसह तिसरं स्थान पटकावलं. २८ सुवर्ण, ३८ रौप्य तसंच ४१ कांस्य अशी एकूण १०७ पदक जिंकत भारतानं पदकतालिकेत चौथा क्रमांक मिळवला आहे.

****

एकदिवसीय क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत काल भारताने आपल्या सामन्यांची विजयी सुरुवात केली. काल चेन्नई इथं झालेल्या अत्यंत रोमांचक सामन्यात भारताने ऑस्ट्रेलियाचा सहा गडी राखून पराभव केला.

***''ऑस्ट्रेलियानं नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला, मात्र भारतीय गोलंदाजांच्या भेदक माऱ्यासमोर पाहुण्या संघाचे फलंदाज अपेक्षित कामगिरी करू शकले नाहीत. रवींद्र जडेजाने तीन, कुलदीप यादव आणि जसप्रीत बुमराह या दोघांनी प्रत्येकी दोन तर मोहम्मद सिराज, रविचंद्रन अश्विन आणि हार्दिक पांड्याने प्रत्येकी एक बळी घेतला. पन्नासाव्या षटकांतले तीन चेंडू शिल्लक असताना ऑस्ट्रेलियाचा संघ १९९ धावांवर सर्वबाद झाला.***

***प्रत्युत्तरादाखल खेळण्यास उतरलेल्या भारतीय संघाचे आघाडीचे तीनही फलंदाज रोहित शर्मा, ईशान किशन आणि श्रेयस अय्यर हे शून्यावर बाद झाले. त्यानंतर विराट कोहली आणि के एल राहुलने संयमी खेळ करत भारताचा डाव सावरला. विराट कोहली ८५ धावांवर बाद झाला. के एल राहुलनं नाबाद ९७ तर हार्दिक पांड्याने नाबाद ११ धावा करत ४२व्या षटकात विजयाचं लक्ष्य साध्य केलं. के एल राहुल सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला.''***

आज या स्पर्धेत न्यूझीलंड आणि नेदरलँड्स संघात सामना होणार आहे. तर भारताचा पुढचा सामना परवा बुधवारी अफगाणिस्तान विरुद्ध होणार आहे.

****

अमरावती इथं काल हाफ मॅरेथॉन स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत दोन हजार तीनशेवर धावपटू सहभागी झाले होते. यापैकी २१ किलोमीटर स्पर्धेत नांदेड इथला धावपटू छगन बोंबले तर दहा किलोमीटर अंतराच्या स्पर्धेतही नांदेडचा विष्णू लहाने हा धावपटू विजयी ठरला.

****

माजी मंत्री आदित्य ठाकरे आज छत्रपती संभाजीनगर इथल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयाच्या पाहणी दौऱ्यावर येत आहेत. रुग्ण संख्या, औषधांची मागणी, उपलब्ध साठा, रुग्णसुविधा आणि रिक्त पदं याबाबत ते अधिष्ठाता यांच्यासोबत चर्चा करणार आहेत.

विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी ही माहिती दिली. दरम्यान दानवे हे आज नांदेड दौऱ्यावर येत असून ते डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात सर्व सुविधांचा आढावा घेऊन, अधिष्ठातांसोबत चर्चा करणार आहेत. त्यानंतर ते खाजगी विमानाने नागपूरकडे प्रयाण करतील.

****

नांदेडच्या डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात काल दुपारी संपलेल्या २४ तासात ९७ रुग्ण बरे होऊन घरी परतले, तर १५ अतिगंभीर रुग्णांचा मृत्यू झाला. सध्या रुग्णालयात ७३२ रुग्ण उपचार घेत आहेत.

****

धाराशिव जिल्ह्यात वाशी तालुक्यातल्या विजोरा इथं साचलेल्या पाण्यात बुडून दोन शाळकरी मुलांचा मृत्यू झाला. प्रवीण साळुंखे आणि यश वाघमारे अशी त्यांची नावं आहेत.

अन्य एका घटनेत परभणी जिल्ह्याच्या जिंतूर तालुक्यातल्या कोसडी शिवारात खाणीत साचलेल्या पाण्यात पोहण्यासाठी गेलेल्या दोन मुलांचा मृत्यू झाला. गजानन वायगुडे आणि मंथन अवताडे अशी त्यांची नावं आहेत.

****

सिक्कीममध्ये आलेल्या पुरात बेपत्ता झालेले बीड जिल्ह्यातले सैनिक पांडुरंग तावरे यांचा पार्थिव देह तीन दिवसानंतर सापडला. त्यांच्या पार्थिव देहावर आज बीड जिल्ह्यात काकडहिरा इथं लष्करी इतमामात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

****

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेनं चालू आर्थिक वर्षात मालमत्ता कर आणि पाणी पट्टी कर वसुलीच्या माध्यमातून २५० कोटी रुपये महसूल संकलनाचं उद्दीष्ट निर्धारित केलं आहे. यासाठी महापालिकेनं मालमत्ता कर भरणा केंद्र दर शनिवारीही सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. दरवर्षी दिवाळी नंतर ही केंद्र दर शनिवारी सुरू ठेवण्यात येत होती.

****

जालना इथल्या जे.ई.एस. महाविद्यालयात “युवा संवाद” या कार्यक्रमांतर्गत भारतीय अंतराळ संशोधन संस्था–इस्रोच्या अहमदाबाद शाखेत कार्यरत शास्त्रज्ञ श्रद्धा गोयंका

अग्रवाल यांनी काल ``चंद्रयान- तीन, एक उपलब्धी" या विषयावर मार्गदर्शन केलं.

****